# प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर, पहिला माळा, बी विंग, वनभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४० ००१,
दूरध्वनी क्र.(०७१२) २५३०१६६, २५५६९१६ फॅक्स क्र. (०७१२) २५५०६७५ ई मेल- apccfnodal@mahaforest.gov.in

क्रमांक : कक्ष-१७/नोसेल/१/आयडी-/ 1121 /१७-१८
नागपूर - ४४० ००१, दिनांक:- 05/08/2017

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रा),
नागपूर

विषय:- नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) पर्यायी वनीकरणाकरीता झुडपी जंगल जमीन उपलब्ध करणेबाबत.

संदर्भ - १. उपाध्यक्ष व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांचे पत्र क्रमांक/मरारविम/०२/भूमी/नामुंशिसंद्रुमा झुडपी जंगल/२०१७, दि.२१/३/२०१७.

२. या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक कक्ष-१७/नोसेल/१/आयडी-३२९, दि.६/५/२०१७.

३.आपले पत्र क्रमांक कक्ष-१/जमिन/८८७, दि.१२/६/२०१७

उपरोक्त विषयांकित प्रकरणी नागपूर-मुंबई सुपर एक्सप्रेस वे (पॅकेज-III) करीता पर्यायी वनीकरणाकरीता झुडपी जंगल जमीन उपलब्ध करणेबाबतच्या प्रस्तावास उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. १ व २ अन्वये आपणास माहीती सादर करण्यास कळविले आहे. सदरहू प्रकल्प हा महाराष्ट्र राज्या करीता अति आवश्यक असल्यामूळे सदर प्रकल्पास पर्यायी वनीकरणाकरीता योग्य असलेले क्षेत्र गोरेवाडा येथे अंतराष्ट्रीय दर्जाचे प्राणी संग्रहालय स्थापन करण्यासाठी ५६४.०० हे. क्षेत्र वळतीकरण्याबाबतचे प्रस्तावासंबंधित गोरेवाडा येथील झुडपी जंगल क्षेत्रातून सहज उपलब्ध होवू शकेल. गोरेवाडा प्राणी संग्राहल व रेस्क्यु सेंटर करीता प्रस्तुत परिस्थितीनूसार फक्त १६० हे.झुडपी जंगल क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी लागत असलेने एकूण निवड केलेले ११२८ हे. क्षेत्रापैकी १६०.०० हे. क्षेत्र राखून ठेवावे आणि इतर ९६८ हे. क्षेत्र सद्यस्थितीत नागपूर मुंबई जलद गति मार्गासाठी उपयोग करणे योग्य राहील.

तरी सदर प्रस्तावाचे पॅकेज-III करीता पर्यायी वनीकरणासाठी ५३.७५४ हे. क्षेत्राकरीता Suitability Certificate व प्रस्तावीत क्षेत्राचा GPS ट्रॅक, KML files (३ नग C.D सह) व वृक्ष लागवडीचे ७ ते १० वर्षाकरीता खर्चाचे अंदाजपत्रक, नकाशासह त्वरीत सादर करावे. अंदाजपत्रकात चेन लिंक फेन्सींगची तरतूद करावी.

करीता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी
महाराष्ट्र राज्य, नागपूर

**प्रतिलिपी:-** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन, मुंबई यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
**प्रतिलिपी:-** मुख्य वनसंरक्षक (प्रा), औरंगाब्राद यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
**प्रतिलिपी:-** मुख्य वनसंरक्षक (प्रा), अमरावती, पुणे, नाशिक, धुळे, ठाणे, कोल्हापूर, यवतमाळ यांना विषयांकित प्रकरणी कळविण्यात येते की, नागपूर-मुंबई शिघ्रसंचार द्रुतगती मार्ग (महाराष्ट्र समृध्दी महामार्ग) पर्यायी वनीकरणाकरीता झुडपी जंगल जमीन नागपूर वनविभागात निवडण्याची कार्यवाही प्रगतीवर आहे. तरी विषयांकित प्रस्तावा संबधी पर्यायी वनीकरणासाठी नागपूर वनविभागाकडे आपले स्तरावरुन आवश्यक क्षेत्रासाठी पाठपुरावा करावा.
**प्रतिलिपी:-** उपवनसंरक्षक, औरंगाबाद/ नागपूर यांना संदर्भिय पत्राचे अनुषंगाने माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.
**प्रतिलिपी:-** उपाध्यक्ष व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यांना संदर्भिय पत्राचे अनूषंगाने माहीतीकरीता अग्रेषित.

कार्यालय उपवन संरक्षक बुलडाणा
आवक क्र. 1035
दिनांक 21 AUG 2017

18 AUG 2017

मु.व.सं.(प्रा.) नागपूर यांचे कार्यालय
आवक क्रमांक 1038
दिनांक - 9 AUG 2017